**<u>नि. दि. दा. क्र. ७६/२०१८ मधील नि. १५ वरील आदेश</u>**
**<u>( शकुंतला भरमू शिरोटे वि. गुलाब मौलाबक्ष डांगे )</u>**

१. प्रस्तुतच्या अर्जाअन्वये प्रतिवादी नं. १ व २ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "No W.S." चा आदेश रद्दबातल करून त्यांची कैफियत कामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादीच्या अर्जामधील कथन असे की, दि.३०/१०/२०१८ रोजी त्यांना दाव्याचे समन्स लागू झालेनंतर दि.१४/११/२०१८ रोजी होवून मुदतीचा अर्ज दिला. त्यानंतर दि.०८/०१/२०१९ रोजी मुदतीचा अर्ज दिला असता तो नामंजूर झाला असून त्यांचे विरूध्द "कैफियत नाही" असा आदेश झाला आहे. प्रतिवादी यांना सरकारी कार्यालयामधून कागदपत्रांच्या नक्कला वेळेमध्ये मिळू न शकल्यामुळे त्यांना कैफियत दाखल करणेस उशिर झालेला आहे. प्रतिवादीनी जाणीवपुर्वक कैफियत देणेस विलंब केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुदध झालेला "No W.S." चा आदेश न्यायाचे हेतूस्तव रद्द करणेबाबत व प्रतिवादींची कैफियत व प्रतिदावा प्रस्तुत कामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे.

३. वादी यांनी नि. १५ च्या पाठीमागे स्वतःचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविलेला आहे. प्रतिवादी यांना दि.३१/१०/२०१८ रोजी नोटीसची बजावणी झाली व दि. १५/०२/२०१९ रोजी विना कैफियत आदेश झाला आहे. प्रतिवादी यांना संधी देवून देखिल त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. तसेच विलंबाबत योग्य व बरोबर कारण दिलेले नाही. केवळ वादींना त्रास देणेसाठी प्रतिवादींनी जाणूनबुजुन विलंब केलेला आहे. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज वाचला. अर्जामधील कथने प्रतिवादीनी शपथेवर सांगितलेली आहेत. दाव्यातील रेकॉर्ड तपासले. प्रतिवादी यांच्याच कथनानुसार नि.९ आले बेलिफ रिपोर्टनुसार प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स दि. ३०/१०/२०१८ इ. रोजी लागू झाल्याचे दिसते. त्या अनुषंगाने प्रतिवादींना कायदयानुसार प्राप्त झालेले ९० दिवस

दि.२९/०१/२०१९ रोजी संपतात. त्यानंतर प्रतिवादीला कैफियत देणेस ५ महिन्याचा विलंब झाल्याचे दिसते. सदरचा विलंब हा प्रतिवादी यांना सरकारी कार्यालयामधून कागदपत्रांच्या नक्कला वेळेमध्ये मिळू न शकल्यामुळे झाल्याचे प्रतिवादीने शपथेवर कथन केलेले आहे. तथापी ती कोणती कागदपत्रे आहेत याचा खुलासा प्रतिवादींनी अर्जात दिलेला नाही. त्यामुळे प्रतिवादींच्या अर्जातील कारण हे मोघम वाटते. वादी ही वयोवृध्द महिला आहे तिच्या वयाचा विचार केला असता दावेचे कामकाज लवकरात लवकर चालणे आवश्यक आहे परंतु केवळ मोघम कारणाच्या आधारे प्रतिवादीने याकामी ५ महिन्याचा विलंब केल्याचे दिसते. पंरतु दावा हा कब्जाकरीता असल्याने प्रतिवादीची कैफियत रेकॉर्डवर आलेस प्रतिवादीला त्याची बाजू मांडण्याची संधी मिळणार असून त्यामुळे वादातील मूळ प्रश्नाची निर्णिती गुणावगुणावर करण्यास न्यायालयास मदत होणार असून त्यामुळे वादीचे कसलेही नूकसान होणार नाही. प्रतिवादीने जाणूनबुजून विलब केलेला आहे असे दिसत नाही. परंतु प्रतिवादीच्या विलंबामुळे दावेचे कामकाज लांबणीवर पडलेने प्रतिवादीचा अर्ज रक्कम रु. ५००/– चा खर्च भरणेच्या अटीवर मंजूर करणे मला न्यायाचे वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादींचा अर्ज रक्कम रु. ५००/– (अक्षरी रु. पाचशे मात्र) चा खर्च भरणेच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादींनी वरिल खर्च वादी यांना पुढील तारखेदिवशी अगर तारखेपूर्वी देणेचा आहे. या अटीची पूर्तता न झालेस प्रतिवादी विरुध्द योग्य ते आदेश पारित होतील.

स्वाक्षरीत/–

मिरज. ( यु. पी. कोळी )

दि. ११/०७/२०१९ २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.